**महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ खाली शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेतर) शासन मान्यता प्राप्त संघटनांच्या पदाधिकारी व व्यवस्थापन समितीच्या निवडणुकीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५१५/प्र.क्र.२१/१६-अ.**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८ मार्च, २०१५.

**प्रस्तावना** :-

शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेतर) संघटनांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच “नवीन आदर्श नियम” ची घटना व नियमांच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येते.

२. अशा मान्यताप्राप्त संघटनांनी त्यांच्या पदाधिकारी व व्यवस्थापन समिती यांच्या निवडणुकीसाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सदर परिशिष्टातील शर्त क्रमांक १० येथे असे स्पष्ट करण्यांत आले आहे की, “कोणतीही मान्यताप्राप्त संघटना आपले पदाधिकारी म्हणून सदस्येतर व्यक्तीची नियुक्ती करु शकणार नाही.”

३. त्याचप्रमाणे मान्यता प्राप्त संघटनांचे पदाधिकारी व त्यांच्या निवडणुकीबाबत अनुसूची दोन येथे विहित घटना व नियमातील नियम क्रमांक ९ व नियम क्रमांक १० मध्ये विहित करण्यांत आलेल्या तरतूदीनुसार प्रत्येक संघटनेत एक अध्यक्ष, मान्यता दिलेल्या संख्येपेक्षा अधिक नसणारे उपाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कार्यवाह आणि कोषाध्यक्ष असे पदाधिकारी असतील. या सर्वांची निवड संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये केली जाईल आणि ते पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरतील. नवीन समिती नियुक्त होईपर्यंत पूर्वीची व्यवस्थापन समिती काम चालू ठेवील, असे देखील सदर तरतुदींमध्ये स्पष्ट करण्यांत आले आहे.

४. शासन मान्य सर्व संघटनांनी एप्रिल किंवा मे महिन्यात संघटनेच्या सर्व सदस्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा घ्यावी अशी तरतूद नियम २० मध्ये विहित असून सदर सर्व साधारण सभेमध्ये घ्यावयाच्या इतर कामकाजासोबत चालू वर्षाकरिता व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि इतर सदस्य यांची निवड करणे याबाबतचे कामकाज घ्यावे अशी तरतूद नियम क्रमांक २० (ब) मध्ये करण्यांत आली आहे.

५. तथापि, असे दिसून आले आहे की, शासन मान्यता प्राप्त असलेल्या संघटनांकडून, संघटनेचे पदाधिकारी व व्यवस्थापन समिती यांची निवडणूक घेताना उपरोक्त विहित तरतुदींचे योग्य प्रकारे पालन करण्यात येत नाही.

६. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचारी (औद्योगिकेतर) यांच्या शासन मान्यताप्राप्त संघटनांनी प्रचलित तरतुदीनुसार आपल्या पदाधिकारी व व्यवस्थापन समिती यांची निवडणूक घेताना शासन मान्य घटना व नियम तसेच नियमावलीतील प्रचलित अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्याबाबत तसेच अशाप्रकारे घेतलेल्या/झालेल्या निवडणुकीनंतर निर्वाचित पदाधिकारी व व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची यादी, पदनाम व कार्यालयीन पत्ता, संपर्क क्रमांक, इत्यादी तपशीलासह शासनास माहिती सादर करण्याबाबत त्यांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार आता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत-

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

१. सर्व शासन मान्यता प्राप्त संघटनांनी त्यांच्या शासन मान्य नियम व घटनेनुसार पदाधिकारी व व्यवस्थापन समिती यांची निवडणूक वेळेवर घेणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ या नियमाखाली शासन मान्यताप्राप्त कोणतीही संघटना आपले पदाधिकारी म्हणून सदस्येतर व्यक्तीची नियुक्ती करु शकणार नाही.

३. शासन मान्यता प्राप्त संघटनांनी आपल्या कार्यकारिणीच्या निवडणुकीचा कार्यक्रम निवडणुकीसाठी निर्धारित दिनांकाच्या किमान ३० दिवसांपूर्वी जाहीर करणे आवश्यक असेल.

४. निवडणुकीचा असा कार्यक्रम घोषित करण्याच्या किमान ७ दिवस अगोदर अशा निवडणुकीसाठी पात्र सदस्य व पात्र मतदार यांची यादी प्रसिध्द करावी.

५. निवडणुकीच्या प्रक्रियेसाठी पात्र सभासदांपैकी एका तटस्थ सदस्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. अशी नियुक्ती निवडणुकीच्या कार्यक्रमासोबत जाहीर करण्यात यावी.

६. नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिका-यास निवडणुकीचे काम पारदर्शकरित्या व नि:पक्षपातीपणे तसेच विहित मुदतीत पार पाडता यावे, याकरिता एक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व आवश्यकतेनुसार कर्मचारी वृंदाची नियुक्ती करता येईल. मात्र, अशा प्रकारे नियुक्त करावयाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा कर्मचारी हे पात्र सभासदांपैकीच असणे आवश्यक आहे व त्यांची संख्या एकूण पात्र मतदारांच्या ५ % मर्यादेपर्यंत असावी.

७. अशा प्रकारे पार पाडलेल्या निवडणुकीचा निर्णय, निवडणूक निर्णय अधिकारी घोषित करतील.

८. नवनिर्वाचित पदाधिकारी व व्यवस्थापन समिती सदस्य यांचे पदनाम,कार्यालयीन पत्ता व दूरध्वनी क्रमांक या माहितीसह संपूर्ण यादी १५ दिवसांच्या आत संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे निश्चित प्राप्त होईल अशा प्रकारे पाठविण्याची जबाबदारी संघटनेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणी मंडळाची असेल.

९. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घोषित केलेल्या निकालाबाबत काही तक्रारी असल्यास अशा सर्व तक्रारी संबंधित कार्यालय प्रमुखामार्फत त्यांच्या अहवालासह शासनाच्या प्रशासकीय विभागाकडे तात्काळ सादर कराव्यात.

१०. पदाधिकारी व व्यवस्थापन समिती यांच्या निवडणुकीच्या निकालाबाबत काही तक्रारी शासनास प्राप्त झाल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख याबाबतीत आपला निर्णय देतील.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१५०३१८१२०५३०३४०७ आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2015.03.23 16:10:04 +05'30'

**(टि.वा. करपते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
२. सर्व सन्माननीय विधान परिषद /विधान सभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -४०० ०३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), विधानभवन, मुंबई-३२.
९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), विधानभवन, मुंबई-३२.
१०.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
११.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
१२.प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१५.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१७.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
१८.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती).

**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रकास प्रसिध्दी देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.**

२०.सर्व मंत्रालयीन विभाग.
२१.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
२२.मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

**(त्यांनी सदर परिपत्रक आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दी करिता लावावे)**

२३.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२४.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपरिषदा.
२५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२६.विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती).
२७.राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२८. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये.
२९.निवड नस्ती/कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (१५ प्रती).

***************